# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** नागपूर महानगरपालिका अंतर्गत नागपूर शहरातील विविध
**{प्रकल्प विभाग-१}** नाल्यांवर लोखंडी जाळया लावण्याचे बांधकाम करण्यास मा. आयुक्त यांनी दि. २९.०५.२०२५ रोजी रु. ९०,६५,१५२/- राशीच्या प्राकलनास मंजुरी प्रदान केली आहे.

करीता रु. ९०,६५,१५२/- राशीला प्रशासकिय मंजूरी प्रदान करणे व निविदा मागविण्याचा प्रश्न विचारात घेण्यास्तव मा. प्रशासक यांचे मान्यतेस्तव सविनय सादर.

**टिप :-**

1. प्रस्तुत कामाकरीता घनकचरा विभागामार्फत पदशिर्ष क्र. A२४००१२२०३०१ अंतर्गत सन २०२५-२६ चे आर्थिक वर्षात रु. ९०,६५,१५२/- प्रावधानास मंजुरी प्राप्त आहे.
2. सदर कामाकरीता मा. अधिक्षक अभियंता यांची रु. ९०,२७,११२/- राशीला दि. २४.०३.२०२५ रोजीची तांत्रिक मंजुरी प्राप्त आहे.
3. निस्तृत टिपणी नस्तीत संलग्न आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 96/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :-** 06/06/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता (प्रकल्प-१), यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिका अंतर्गत नागपूर शहरातील विविध नाल्यांवर लोखंडी जाळया लावण्याचे बांधकाम करण्यास मा. आयुक्त यांनी दि. २९.०५.२०२५ रोजी रु. ९०,६५,१५२/- राशीच्या प्राकलनास मंजुरी प्रदान केली आहे.

करीता रु. ९०,६५,१५२/- राशीला प्रशासकिय मंजूरी प्रदान करणे व निविदा मागविण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मान्यता प्रदान केली.